DAY — 19 SEAT NUMBER

2023 III 17 | 1100 | **J-370** | (M)

# GEOGRAPHY (39)

Time : 3 Hrs. (7 Pages) Max. Marks : 80

*सूचना : (१) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.*
*(२) प्रश्नांची उत्तरे लिहिताना आवश्यक तेथे योग्य आकृत्या / आलेख काढावे.*
*(३) रंगीत पेन्सिलचा वापर करण्यास परवानगी आहे.*
*(४) नकाशा स्टेन्सिलचा वापर योग्य तेथे करावा.*
*(५) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.*
*(६) नकाशा पुरवणी मूळ उत्तरपत्रिकेस जोडावी.*

**प्र. १.** दिलेल्या सूचनेनुसार खालील उपघटक सोडवावेत. [२०]

**(अ)** साखळी पूर्ण करून उत्तरपत्रिकेत पुन्हा लिहा : (५)

| अ. नं. | 'अ' | 'ब' | 'क' |
|---|---|---|---|
| १. | सागरी वाहतूक | (क) १५ ते ५९ वयोगट | (म) मासेमारी पूरक क्षेत्र |
| २. | कार्यशील लोकसंख्या | (ख) प्लवंग | (भ) तृतीयक व्यवसाय |
| ३. | दंतूर किनारा | (ग) बंदराचा विकास | (ब) मनुष्यबळाची उपलब्धता |
| ४. | माथेरान | (घ) मातीची निर्मिती व गुणधर्म | (प) व्यापारास अनुकूल |
| ५. | मृदाशास्त्र | (ड) पर्यटन | (द) मर्यादित मासेमारी |
| | | (ङ) प्राथमिक व्यवसाय | (ज) प्राकृतिक भूगोल |

(ब) 'बरोबर' की 'चूक' ते लिहा : (५)

(१) लोकसंख्येचे वितरण सर्वत्र समान असते.

(२) भौगोलिक विविधता ही व्यापारास कारणीभूत नसते.

(३) प्रादेशिक विकास हा प्राकृतिक रचनेवर अवलंबून असतो.

(४) भूगोल विषयाचे स्वरूप गतिशील आहे.

(५) भूगोल विषयाचा अभ्यास आंतरविद्याशाखीय आहे.

(क) अचूक पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा : (५)

(१) अक्षांशांशी थेट संबंध नसलेला प्राथमिक व्यवसाय –

(अ) लाकूडतोड (ब) मासेमारी

(क) खाणकाम (ड) शेती

(२) संयुक्त संस्थानाचे औद्योगिक विभाग देशाच्या ईशान्य भागात स्थापन झाले आहेत –

(अ) तेथे लोकसंख्या दाट आहे

(ब) तेथे मोठ्या प्रमाणावर भांडवल उपलब्ध

(क) तेथे कोळसा व लोह ही खनिजे भरपूर प्रमाणात उपलब्ध आहेत

(ड) तेथे वाहतूक मार्गाचे केंद्रीकरण झालेले आहे

(३) ट्रान्स ऑस्ट्रेलियन लोहमार्ग स्थानक –

(अ) पर्थ – सिडनी (ब) पर्थ – व्लॉदिवोस्टोक

(क) सिडनी – व्हॅन्कुवर (ड) व्हॅन्कुवर – व्लॉदिवोस्टोक

(४) स्ट्रॅबो हे तत्त्ववेत्ते या देशातील आहेत –

(अ) इंग्लंड (ब) अरब

(क) रोम (ड) ग्रीक

(५) 'गेस-पिरिऑड्स' (पृथ्वीचे वर्णन) या पुस्तकाचे लेखक –

(अ) हेकेटस (hecataeus) (ब) स्ट्रॅबो

(क) हम्बोल्ट (ड) रिटर

(ड) पुढील विधाने दिलेल्या सूचनेनुसार पूर्ण करा : (५)

(१) लोकसंख्येचे वितरण खंडानुसार चढत्या क्रमाने लावा.

(अ) आफ्रिका (ब) उत्तर अमेरिका

(क) दक्षिण अमेरिका (ड) आशिया

(२) भांडवल गुंतवणुकीनुसार उद्योगांचा चढता क्रम लावा.

(अ) मध्यम उद्योग (ब) सूक्ष्म उद्योग

(क) मोठे उद्योग (ड) लघू उद्योग

(३) चुकीचा गट ओळखा :

(अ) (१) सातपुडा
(२) दख्खन
(३) आल्प्स
(४) रॉकीज

(ब) (१) यवतमाळ
(२) अमरावती
(३) सोलापूर
(४) पालघर

(क) (१) थर
(२) सहारा
(३) कलहरी
(४) गोबी

(ड) (१) मराठवाडा
(२) खान्देश
(३) विदर्भ
(४) कोकण

(४) अचूक गट ओळखा :

(अ) (१) दूरध्वनी
(२) मोबाईल
(३) इंटरनेट
(४) दूरदर्शन

(ब) (१) आवर्त
(२) टपाल
(३) अक्षांश-रेखांश
(४) सांकेतिक भाषा

(क) (१) चित्रे
(२) लिपी
(३) विविध आवाज
(४) पर्वत

(ड) (१) पेजर
(२) ई-मेल
(३) खनिजे
(४) मैदान

(५) चुकीचा घटक ओळखा :

जगातील आंतरराष्ट्रीय विमानतळ असणारी शहरे पूर्वेकडून पश्चिमेकडे योग्य क्रमाने लिहा :

(अ) न्यूयॉर्क (ब) दिल्ली

(क) टोकियो (ड) लंडन

**प्र. २. खालील विधानांची भौगोलिक कारणे लिहा (कोणतीही चार) : (कोणतेही तीन मुद्दे)** [१२]

(१) वाहतुकीच्या सोयीमुळे लोकवस्तीत वाढ होते.

(२) नगराची वाढ ही भूमी उपयोजनाशी निगडित आहे.

(३) कॅनडामध्ये लाकूडतोड व्यवसायाचा विकास झाला आहे.

(४) कोकणातील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात अनेक फळप्रक्रिया उद्योग स्थापित झालेले आढळतात.

(५) तृतीयक आर्थिक क्रियांमध्ये सेवा आणि विनिमय यांचा समावेश असतो.

(६) हिमालय पर्वतीय प्रदेशाचा विकास फारसा झालेला नाही.

**प्र. ३. खालील संज्ञांमध्ये फरक स्पष्ट करा (कोणतेही तीन) :** [९]

(१) लोकसंख्या संक्रमण सिद्धांताचा पहिला टप्पा आणि पाचवा टप्पा

(२) विस्तारणारा लोकसंख्या मनोरा आणि संकोचणारा लोकसंख्या मनोरा

(३) केंद्रित वस्ती आणि विखुरलेली वस्ती

(४) मळ्याची शेती आणि विस्तृत व्यापारी शेती

(५) प्राथमिक आणि द्वितीयक व्यवसाय

**प्र. ४.** (अ) खालील माहिती नकाशामध्ये पुढील बाबी योग्य चिन्हांच्या साहाय्याने दाखवा आणि सूची तयार करा (कोणतेही सहा) : (६) [११]

(१) ऑस्ट्रेलियातील विरळ लोकसंख्येचा प्रदेश

(२) लोकसंख्या संक्रमण सिद्धांतातील पाचव्या टप्प्यातील देश - स्वीडन

(३) संयुक्त राष्ट्र अमेरिकेमध्ये महाकाय नगर - न्यूयॉर्क

(४) अरबी समुद्रातील खाणकाम क्षेत्र - मुंबई

(५) ऱ्हूर औद्योगिक पट्टा

(६) दोन खंडादरम्यान वाहतूक करणारा लोहमार्ग - ट्रान्स सायबेरियन लोहमार्ग

(७) पनामा कालवा

(८) सर्वात कमी लिंगगुणोत्तर असणारा देश - संयुक्त अरब अमिरात

(ब) आलेख / नकाशा वाचन करून प्रश्नांची उत्तरे लिहा : (५)



(१) प्राथमिक आर्थिक क्रियांमध्ये सर्वात कमी लोकसंख्या कोणत्या वर्षी गुंतलेली आहे?

(२) द्वितीयक आर्थिक क्रियांमध्ये १९७१ आणि १९९१ तील गुंतलेल्या लोकांची टक्केवारी सांगा.

(३) १९५१ ते २०११ मध्ये सर्वात कमी प्रमाणात गुंतलेल्या आर्थिक क्रिया कोणत्या?

(४) २०११ या वर्षी द्वितीयक आणि तृतीयक आर्थिक क्रियात वाढ होण्याचे कारण काय असावे?

(५) कोणते वर्ष आर्थिकदृष्ट्या अधिक उन्नतीचे आहे?

**प्र. ५. खालीलपैकी संक्षिप्त टिपा लिहा (कोणत्याही तीन) :** **[१२]**

(१) भूरचनेचा लोकसंख्या वितरणावरील प्रभाव

(२) लोकसंख्येची व्यावसायिक संरचना

(३) व्यापारात वाहतुकीची भूमिका

(४) प्रादेशिक विकासावर परिणाम करणारे घटक

(५) भूगोल अभ्यासकाची कौशल्ये

**प्र. ६. (अ)** खालील दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून प्रश्नांची उत्तरे लिहा : (४) **[८]**

नैसर्गिक संसाधनात भूमीला विशेष महत्त्व आहे. कारण अन्नधान्य, घरे, तलाव, उद्योग, रस्ते, लोहमार्गाची उभारणी, चारा व वृक्ष लागवडींसाठी भूमीचीच आवश्यकता असते. देशात सुपीक जमीन जास्त असल्यास शेतीतील उत्पादकता जास्त असते. वन संपत्तीमुळे पशुपालन, औषधी वनस्पतींची उपलब्धता मोठ्या प्रमाणात होते. त्याचबरोबर पर्यावरणाचा समतोल साधला जातो.

भारत देशाचे भौगोलिक क्षेत्रफळ ३२,८७,२६३ चौ.कि.मी. असून क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारताचा जगात सातवा क्रमांक आहे. लागवडीखालील क्षेत्रात भारताचा सातवा क्रमांक आहे. लागवडीयोग्य क्षेत्र १८,६४,००,००० हेक्टर आहे. देशातील एकूण क्षेत्रफळापैकी याचे प्रमाण ७७% आहे. देशातील मात्र एकूण लागवडी खालील क्षेत्राच्या ४६ टक्केच क्षेत्राचा लागवडीसाठी उपयोग होतो. देशातील लोकसंख्येत

वाढ, उद्योगांचा विकास, रस्ते व तलाव निर्मिती यांसारख्या कारणांमुळे लागवडीखालील क्षेत्रात घट होत आहे.

भारतात भूमीच्या गुणधर्मांबाबत खूप भिन्नता आढळते. उत्तरेकडील राज्य पर्वतीय क्षेत्रात असल्यामुळे त्याठिकाणी लागवडीखालील जमिनीचे क्षेत्र, जमिनीची सुपीकता कमी आहे. राजस्थान व गुजरात राज्यांचा काही भाग वाळवंटी स्वरूपाचा आहे. तर मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, पंजाब, हरियाणा, महाराष्ट्र या राज्यांमध्ये सुपीक जमिनीचे प्रमाण जास्त आहे.

प्रश्न :

(१) सर्वात महत्त्वाचे नैसर्गिक संसाधन कोणते आहे?

(२) भूमीचे विविध उपयोग कोणते?

(३) जगातील देशांच्या क्षेत्रफळाच्या क्रमवारीत भारताचा क्रमांक कितवा आहे?

(४) भारतातील लागवडीखालील क्षेत्र वाढविण्यासाठी उपाय सुचवा.

**(ब)** आकृती काढून नावे द्या (कोणतेही दोन) : (४)

(१) लोकसंख्या संक्रमण सिद्धांत

(२) स्थिरावलेला मनोरा

(३) भूगोलाचा अन्य विषयांशी असलेला सहसंबंध

**प्र. ७. सविस्तर उत्तरे लिहा (कोणताही एक) :** **[८]**

(१) सखोल उदरनिर्वाहक शेतीबद्दल माहिती लिहा.

(२) उद्योगाच्या स्थानिकीकरणावर प्राकृतिक घटकांचा होणारा परिणाम स्पष्ट करा.

◆◆◆